जिल्हा वार्षिक योजनेतील "मूल्यमापन, संनियंत्रण व डाटा एन्ट्री" अंतर्गत निधीचा उपयोग करण्यासबंधी मार्गदर्शक सुचना .

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक:डिएपी-१०१६/प्र.क्र.८३/का.१४८१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २५ सप्टेंबर, २०१८

<u>वाचा</u>- नियोजन विभाग ,शासन निर्णय क्रमांक:डिएपी-१०१४/प्र.क्र.१९८/का.१४८१, दि. २७/०८/ २०१४.

<u>पुरकपत्र</u>

नियोजन विभागाचा शासन निर्णय क्रमांक डिएपी-१०१४/प्र.क्र.१९८/का.१४८१ दिनांक २७ ऑगस्ट,२०१४ अन्वये जिल्हा वार्षिक योजनेतील "मूल्यमापन, संनियंत्रण व डाटा एन्ट्री "अंतर्गत निधीचा कालबध्द त-हेने उपयोग होण्याकरिता खालील बदल करण्यात येत आहे.

(अ) उपरोक्त नमूद शासन निर्णयामधील परिशिष्ट "ब" "मूल्यमापन संनियंत्रण व डाटा एन्ट्री " मधील परिच्छेद २ खालीलप्रमाणे वाचण्यात यावा.

परिच्छेद क्र.२. सदरचा निधी खालील बाबींसाठी खर्च करता येईल:-

i) खाजगी/बाह्य संस्थांद्वारे योजनांतर्गत योजनांचे मूल्यमापन करुन घेणे. याबाबत नियोजन विभागाचा शासन निर्णय क्र. मुमाअ-१०१६/प्र.क्र.७८/का-१४१७, दि. २२/०७/२०१६ व दि. २६/०९/२०१७ अन्वये योजनांच्या मूल्यमापनासाठी तयार करण्यात आलेल्या बाह्यस्थ संस्थांच्या नामिका सूचीतील संस्थांसह "उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा शासन निर्णय क्रमांक:बैठक ३६११/(५६/१५)/तांशि-२, दि. १३/०१/२०१६ अन्वये उन्नत महाराष्ट्र अभियानांतर्गत निवड केलेल्या संस्थांचा समावेश राहील."

(ब) उपरोक्त नमूद शासन निर्णयातील परिशिष्ट "ब" मध्ये नवीन " परिच्छेद क्र. ९" खालीलप्रमाणे समाविष्ट करण्यात येत आहे :-

परिच्छेद क्र.९. "मूल्यमापन संनियंत्रण व डाटा एन्ट्री" करीता संबंधित जिल्हा नियोजन अधिकारी यांची " नोडल ऑफीसर" म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

२. सदर शासन पुरकपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०९२५१६५४३०८३१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vijesing Fattesing Vasave

Digitally signed by Vijesing Fattesing Vasave
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a7de9682e22326e67a2c7e4125e658721c298e3504 8adffdff595b37a1b194aa, cn=Vijesing Fattesing Vasave
Date: 2018.09.26 15:33:09 +05'30'

(वि.फ. वसावे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,

२)मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३)मा. मंत्री तथा पालकमंत्री (सर्व जिल्हे) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४)मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५)मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६)मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
७)महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता-१/२), मुंबई/नागपूर.
८) सर्व विभागीय आयुक्त.
९)सर्व जिल्हाधिकारी,
१०)सर्व जिल्हा नियोजन अधिकारी.
११)महालेखापाल (लेखापरिक्षा-१/२), मुंबई/नागपूर.
१२)अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१३)सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१४)निवड नस्ती.(कार्यासन १४८१)